MHLA160000772009

<u>नियमित दिवाणी दावा क्र.५९/२००९</u>
<u>शकुंतलाबाई वि. वेंकट व ईतर</u>

–:: <u>नि.क्र.१ लगत आदेश</u> ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. सन्माननीय उच्च न्यायालयाने दावा पुर्नसंपरिक्षेकरिता पाठविलेला आहे आणि दोन्ही पक्षांना हजर राहण्याबाबत निर्देश दिलेले होते. परंतु वादी ही दि.१६/१०/२०२५ पासून नियमित गैरहजर आहे. दावा दर दोन दिवसाला फलकावर येतो. परंतु वादी हजर नाही. दावा गुणवत्तेवर निकाली काढणे आवश्यक आहे. सबब न्यायाच्या दृष्टीने एकदा वादीला कोर्ट मोशनद्वारे नोटीस काढल्यास कोणालाही नुकसान होणार नाही. त्याचा दावा गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी फायदा होईल. सबब वादीला कोर्ट मोशनद्वारे नोटीस काढावी आणि सन्माननीय वरिष्ठ स्तर निलंगा यांच्याकडील बेलिफांना नोटीस लवकरात लवकर बजावण्याकरिता पत्र देण्यात यावे.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.11.10 17:08:10 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – १०–११–२०२५**

**( श.अ. सुरजुसे )**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**